# प्रकरण तिसरे

# प्रकरण तिसरे.

## १९८४ ची सार्वत्रिक निवडणूक.

### १. राजकीय पार्श्वभूमी :

जानेवारी १९८० च्या निवडणूकीने निःसंदिग्धपणे कॉंग्रेस [आय] प्रमुख श्रीमती इंदिरा गांधी यांच्याकडे सत्तासूत्रे सोपविली. त्याचबरोबर जनता राजवट संपुष्टात आली. कायदा आणि सुव्यवस्था तसेच निश्चित प्रगतीची वाटचाल यासाठी धडपडणाऱ्या भारतीय जनतेने एका आत्मविश्वास पूर्ण नेतृत्वाकडे सर्व अधिकार सोपविले. १९८४ च्या लोकसभा निवडणूक पूर्व स्थितीचा ऐतिहासिक आढावा घेतला असता १९८० ते १९८४ या काळात अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक बदल झाले याचा परिणाम या निवडणूकीवर झालेला आहे. या ठिकाणी कॉंग्रेसने दिलेल्या आश्वासनांची भूमिका अधिक महत्वाची होती. परंतू या पक्षाने दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यापेक्षा जनता राजवटीवर दोषारोप ठेवण्यात बराचसा कालावधी घालविला. १९८० मध्ये संसदेच्या संयुक्त अधिवेशनामध्ये ध्येयधोरण विषयक ठराव मांडतांना राष्ट्रपतींनी जुन्याच घोषणा केलेल्या दिसतात. २० कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी आणि कायदा व सुव्यवस्थेची हमी ह्या घोषणा म्हणजे जनता राजवटीपेक्षा वेगळे असे काही नव्हते. स्टील, सिमेंट, उर्जा इ. गरजांशी संबंधित नसलेल्या गोष्टींकडे अधिक लक्ष पुरविले गेले. यामुळे ग्रामीण आणि शहरी बेकारीचे निर्मुलन करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा हातभार लागला नाही. म्हणजेच सत्ता हाती आल्यानंतर पूर्वीच्या सरकारने केलेल्या चुका सुधारण्यासाठी कोणताही रचनात्मक कार्यक्रम आखल्याचे दिसत नाही. गरीबी हटाव, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता यासारख्या जुन्या घोषणा तात्विक चर्चेपुरत्याच राहिल्या. जेंव्हा नवीन कांही शिकण्याची, करण्याची संधी प्राप्त झाली तेंव्हा शिकण्याऐवजी घोषणा करण्यातच वेळ घालविला. यामुळे देशात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले.

राजकीय दृष्टीकोनातून विचार केला तर १९८० ते १९८५ मध्ये सत्ताधारी काँग्रेस पक्षाला कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात अपयश आलेले दिसते. यावरून असे दिसते की काँग्रेस [आय] म्हणजे नवीन उद्दीष्टये असलेले सरकार न राहता जनता राजवटीला केवळ पर्याय उरला. असे असले तरी मुद्दा दिलेल्या आश्वासनाप्रमाणे काँग्रेसने आसाममधील परिस्थिती आणि उत्तरपूर्व भागात उद्भवलेले राष्ट्रीय एकात्मतेचे आवाहन पेलण्याचा प्रयत्न केला होता. विशेषतः मणिपूर, नागालँड, त्रिपुरा, मिझोराम, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय या सात राज्यांनी त्यांच्यावर लादलेल्या केंद्रीय निष्टेविरुद्ध आवाज उठविला आणि केंद्र-राज्य संबंधामधील संकेत डावलण्याचा प्रयत्न केला. जवळजवळ तीन दशके या राज्यांचे प्रश्न डावललेले होते. या सरकारच्या ताठर भूमिकेमुळे आसाम आणि इतर राज्यांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. परकीय नागरिकांच्या वास्तव्याविरूध्दचे आंदोलन सुमारे सोळा महिने चालले. या आंदोलनामुळे आसाममध्ये कायदा व सुव्यवस्था, राजकीय स्थैर्य, राष्ट्रीय एकात्मता आणि आर्थिक विकास घडवून आणण्यास केंद्र सरकारला अपयश आले.[१] बांगला देशाशी संबंधीत असे आसाम आंदोलन असल्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळे स्वरूप प्राप्त होण्याचा धोका निर्माण झाला. त्यामुळेच हा प्रश्न अधिक नाजूक बनला. निर्वासितांच्या या प्रश्नांचा संबंध येथील, विद्यार्थ्यांवर, मध्यमवर्गावर व इतर काही संघटीत लोकांवर होणा-या अन्यायाशी जोडला गेला आणि कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सत्तारूढ पक्षासह सर्वच राजकीय पक्षांना याठिकाणी अपयश आले. याच दरम्यान या प्रदेशासाठी भरघोस अनुदान दिले परंतू त्याचा फारच थोडा भाग आसामपर्यंत पोहोचला.[२] या सर्व अपयशाची राजकीय कारणे शोधल्यास आसाममधील परिस्थितीबाबत राजकीय संवेदनशिलता आणि प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावरील नेत्यामधील समन्वयाचा अभाव या दोहोंचा परिणाम झाल्याचे दिसून येते.

या काळात आसाम सोडून वेगवेगळ्या ठिकाणी हिंसाचार उद्भवला. या हिंसाचाराला आळा घालण्यास सरकार अपयशी ठरले. विशेषतः जातीय

हिंसाचार आणि धार्मिक चिथावणी याद्वारे दंगली घडवून आणल्या गेल्या. याचे उदाहरण म्हणजे मोरादाबाद येथे झालेली दंगल हाताळण्यामध्ये सरकारचे धोरण अपयशी ठरले. मोरादाबादपाठोपाठ संबळ, बरेली, आग्रा आणि कानपूर या ठिकाणी जातीय दंगलींचा उद्रेक होतच राहिला. या दंगलीमध्ये कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळलेली होती. अल्पसंख्यांकाना संरक्षण देण्यास सरकार पूर्णपणे अपयशी ठरले. पोलिस बळाचा अतिरिक्त वापर नेहमीच टिकेचा विषय बनला. १९८० मध्ये बागपत येथे पोलिसांकडून झालेला अत्याचार आणि बिहारमध्ये कैद्यांना आंधळे बनविण्याचा झालेला अमानुष प्रकार या दोन घटनाबरोबर अनेक घटनांमुळे केंद्र सरकार टिकेचा विषय बनले. याशिवाय वेगवेगळया प्रांतात कायदा व सुव्यवस्था राखण्यास केंद्र सरकार अपयशी ठरले.

१९८० ते १९८४ या काळातील आर्थिक स्थितीचा विचार केला तर १९८० च्या निवडणूकीत काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळूनही अर्थव्यवस्था सावरण्यामध्ये त्यांना अपयश आले. कायदा आणि सुव्यवस्थेप्रमाणेच आर्थिक आघाडीवरसुध्दा काँग्रेसने केलेल्या घोषणा म्हणजे प्रभावी कृतीपेक्षा आदर्शवादी विधानेच ठरली. परिणामकारक धोरणे अवलंबिली गेली नसल्याचेच काही दिवसात सिध्द झाले आणि लोकांचा अपेक्षाभंग झाला. काही गोष्टी-मध्ये सुधारणा करण्याकडे अधिक लक्ष दिले मात्र अशा गोष्टींचा नवीन दिशा प्राप्त करण्यासाठी काहीही उपयोग झाला नाही. यावेळी सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये महागाईला आळा घालण्याची व उत्पादन वाढविण्याची हमी दिली. परंतू या काळात जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती हळूहळू वाढत जावून त्यांनी उग्ररूप धारण केले. अशाप्रकारे अर्थसंकल्प सामान्य माणसांचा आधार न बनता सर्वसामान्य मानसाचे जीवन असाहाय्य करणारा ठरला. त्याचप्रमाणे उत्पादनक्षमताही फारशी वाढली नाही.[3] म्हणजे हा अर्थसंकल्प ग्रामीण आणि शहरी सर्वसामान्य माणसाऐवजी मध्यमवर्गीयांसाठी तयार केला ही गोष्ट लपून राहिली नाही. वैयक्तीक करामध्ये सवलती दिल्या तसेच प्रेशरकुकर, टुथपेस्ट, शिलाई मशीन इत्यादी वस्तूवरील करात सूट दिली होती.

मात्र ही सूट गरीबी आणि दारिद्र्य निर्मुलनामध्ये कोणताही हातभार लावू शकत नव्हती. अर्थमंत्र्यांनी ग्रामीण रोजगार योजनेची घोषणा केली मात्र या कार्यक्रमाचा संबंध ग्रामीण गाण्याशी जोडला नाही त्यामुळे हा कार्यक्रम प्रभावी होऊ शकला नाही.

१९८० मधील धोरणात्मक निर्णय आर्थिक कृतीमध्ये सुस्पष्टरित्या राजकीय पुढाऱ्यांकडून हाताळण्यात आला नाही. राजकीय कृती, दारिद्र्य जातीय, प्रादेशिक चळवळी यामध्ये शासनाला आपयश आल्यामुळेच त्याचेच पडसाद आर्थिक धोरणावर दिसले. आर्थिक स्थिरता व विकास साधण्यासाठी अनुकरणाची उणीव स्पष्ट झाली. यावरून किंमत स्थिरता प्रस्तावित करण्यासाठी कोणतेही गंभीर प्रयत्न झाले नाहीत हे निःसंशयीतपणे स्पष्ट होते.

शासनाचा दुबळेपणा उघड करणारे अनेक बोलके घटक आहेत, त्यामध्ये शेतमजूरांच्या राहणीमानाचा निर्देशांक १९७१ पेक्षा वाढीव आहे. औद्योगिक निर्देशांकसुध्दा उत्साहवर्धक अशा स्वरूपाचा नाही. आयात वाढली आणि निर्यात कमी झाली याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला.

या काळात सरकारच्या धोरणात्मक निर्णयाविरूध्द भारतात अनेक राज्यात राजकीय प्रतिकाराला चालना मिळाली. यामुळे भारतीय लोकांच्या दृष्टीने कार्यकरण्यास अपयशी ठरलेला पक्ष आणि इतर राजकीय पक्ष की जे चांगले कार्य करू शकतील यामधून निवड नव्हती. जरी सत्ताधारी पक्षाबाबत ते समाधानी राहिले तरी देखील विरोधी पक्ष त्यांना संभाव्य कुशल शासन देण्याच्या अवस्थेत नव्हते की जे शासन लोकांच्या दृष्टीने कार्यकुशल शासन ठरेल. श्रीमती इंदिरा गांधींनी निदान राष्ट्रीय प्रशासनाचे औपचारिक साधन योग्य व सुसंघटीतपणे देवू केले. पश्चिम बंगाल आणि केरळसारख्या प्रमुख राज्यामध्ये की ज्या ठिकाणी काँग्रेस विरोधी धोरणाची मार्क्सवादी

कम्युनिस्ट पक्षाचे संमिश्र सरकार होते. या शासनाबाबत निराशाजनक सूर उमटला. मात्र प्रादेशिक पातळीवर एकत्र आलेल्या गुटांच्या आघाडीत डाव्या किंवा विरोधी पक्षाकडून समन्वयाची शक्यता देशाच्या दृष्टीने निर्माण झाली.

१९८० नंतरच्या राजकीय स्थितीचे रोमांचकारी असे खास वैशिष्ट्य म्हणजे शेतकरी चळवळींची वाढ ही राष्ट्रीय महत्वाच्या राजकीय बळामध्ये झाली. कर्नाटकातील मलप्रभा जलसिंचन परिसरातील शेतकऱ्यांची चळवळ याचे उत्तम उदाहरण आहे याचे कारण या परिसरातील शेतकऱ्यांना हंगामासाठी लागणाऱ्या आर्थिक मदतीचा अभाव होय. ग्रामीण बँकांनी त्यांना मदत नाकारली, वरिष्ठ प्रशासनाने त्यांच्या मागण्या दुर्लक्षिल्या आणि कर्नाटकातील काँग्रेस नेत्यांनी याबाबत तटस्थेची भूमिका स्वीकारली. त्यामुळे या शेतकऱ्यांनी प्रतिकाराची मोहिम हाती घेतली. जवळजवळ १० वर्षे मलप्रभा जलसिंचन योजना समस्या दुर्लक्षिली गेली. भारतातील इतर सर्व भागातील कृती शेतकऱ्यांच्या विविध शेतीप्रश्नाबाबत फोफावू लागल्या. शेतकरी संघटन व चळवळींना पश्चिम भारतामध्ये फार मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळू लागला. मलप्रभा चळवळीप्रमाणे महाराष्ट्रात नगदी पिकांच्या किंमती निर्धारणासंदर्भात चळवळ सुरु झाली. पश्चिम व उत्तरेकडील कांहली राज्यात तेलबियांवर सूट, डिझेल इंधनावर वाढीव सवलती मिळावी म्हणून उठाव झाले. वास्तविक बिहार, उत्तरप्रदेश व भारतातील इतर राज्यामधील कमी प्रमाणात असणारी रोजगार मजूरांची कृती जीवंत राहिली आणि विविध स्तरांवर विकसित होत गेली. बिहारमधील रोजंदार लढे हे धर्मवादी व जाती जमातींच्या संमिश्र परिस्थितीला सामोरे गेले. पश्चिम भारतातून फोफावत आलेल्या या शेतकरी चळवळीचे मूळ हे मूलभूत दारिद्र्य व असमतोलासारख्या भारतातील समस्यांशी निगडीत होत गेले.

प्रस्थापित संघटना व शेतकरी चळवळीची आश्चर्यकारक वाढ ही स्पष्टपणे राजकीय पक्षांच्या अपयशाबरोबरच राजकीय पध्दतीतील अपूर्णता

स्पष्ट करते. अशा पध्दतीत विकास कार्यक्रमांना कशा पध्दतीने हाताळावयाचे किंवा कोणती अपेक्षित भूमिका बजावावयाची याबाबत सत्ताधारी काँग्रेस पक्ष आपली भूमिका समजू शकला नाही हे स्पष्ट झाले. परंतु याबरोबरच विरोधी पक्षांनासुध्दा हे प्रश्न हाताळणे जमले नाही. या काळात काँग्रेस पक्षसुध्दा संवेदनशील राहिला नव्हता. कारण हा पक्ष नवे धोरण किंवा जुन्या रूढींचा गुलाम होता. इतर राजकीय पक्षही आपली भूमिका उत्तम प्रकारे बजावू शकले नाहीत. म्हणूनच शेतकरी आंदोलने व इतर आंदोलनामुळे संपूर्ण देशभर प्रतिकाराची चळवळ उभी राहिली.

डाव्या पक्षांच्या बाबतीत असलेले सत्ताधारी पक्षीचे धोरण ही या काळात योग्य अशा स्वरूपाचे नव्हते. भारतातील मार्क्सवादी पक्षाकडून हाताळल्या जाणाऱ्या क्रांतीकारी राजकीय संघटनांनी जरी राष्ट्रीय पातळीवर प्रबळ नसल्या तरीदेखिल राज्यपातळीवर पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरा या राज्यांत त्यांनी कार्य सुरू केले व मध्यमवर्गीयांच्यामध्ये जातीवर व वर्गावर आधारलेल्या राजकीय पक्षांनी आपली पाळेमुळे काळजी-पूर्वक रोवली, की ज्यामुळे इंदिरा गांधींचा जाहिरनामा पाडिल्याशिवाय अपयशी ठरला. या राज्यांनी पारंपारिक पध्दतीपासून आगळी वेगळी अशा पध्दतीची एक नवीन राज्यकारभार पध्दती देऊ केली. त्रिपुरासारख्या लहान राज्याला यामध्ये आदर्शात्मक उदाहरण ठरता आले नाही. दारिद्र्य-रेषेखालील लोकसंख्या व नैतिक अंध:पतन यांच्या प्रभावामुळे त्या राज्याला वर्षाच्या मध्यावरच जोखीम हाणीला सामोरे जावे लागले. परंतु मार्क्सवादी पक्षाचे प्रस्थापन राजकीय सत्तेवर येणे हे होते. यासाठी विविध पक्षांचे संयुक्तीकरण करावे लागले. केरळमध्ये शहरी व ग्रामीण लोकांच्या कल्याणामध्ये राजकीय, आर्थिक मुल्यमापनासाठी याची मदत झाली. धोरणांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी केरळचे राजकारण मानले गेले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पश्चिम बंगालमध्ये मात्र डाव्या शासनाच्या केंद्रीय सत्तेविरोधी नेतृत्वाखाली येणाऱ्या समस्या अधिक उठावदार झाल्या. केरळ राज्यामध्ये घडल्याप्रमाणे पश्चिम बंगालमधील समाजवादी प्रेरणा ही ग्रामीण व शहरी गरीब लोकांच्या समाजकल्याणाकरीता धोरणे राबविण्यासाठी रूपांतरीत करण्यात आली. त्यामुळे राजकीय नेत्यांकडून अपेक्षिल्याप्रमाणे जमीनसुधारणा, शेतीसाठी कर्ज यांची विभागणी अनुकूल अशी करता आली नाही.

दुसऱ्या बाजूने विचार करता केरळ आणि पश्चिम बंगालमधील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सत्ताधारी राज्यकर्ते यांना संमिश्र यश मिळाले होते. केरळमधील राज्यसत्ता कायदा आणि सुव्यवस्था या समस्यांनी जखडली होती. पश्चिम बंगाल सरकारला विद्युतगतीने सुधारणा करण्याकरता मोठे अपयश आले. मात्र मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांच्या नेत्यांना विशिष्ट मर्यादित राहून काम करीत असतांना ग्रामीण गरिबांसाठी फायदेशीर ठरतील या नात्याने प्रात्यक्षितरित्या योजना राबविण्यात ही राज्ये काही प्रमाणात यशस्वी ठरली.

परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतीत विचार केला तर जनता राजवटीच्या काळात परराष्ट्रसंबंधामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले म्हणूनच काँग्रेसने अशी अपेक्षा केली की, परराष्ट्रासंबंधी चांगले व्यवस्थापन हे भारताला जगात चांगले स्थान मिळवून देईल. म्हणूनच या काळात काँग्रेस पक्षाने सुरवातीपासूनच अनावश्यकरित्या अलिप्ततावादी राष्ट्रापासून वेगळेपणा स्वीकारला. भारताचे परराष्ट्र धोरण रशियाशी घनिष्ट असल्याचा प्रभाव दिसला. तिसऱ्या जगातील देशांचा सोव्हिएट रशियन धोरणावर कोणताही प्रभाव दिसून आला नाही. इराण-इराक युध्दाच्यावेळी भारताने केवळ बघ्याची भूमिका घेतली. भारताच्या शांततेच्या हेतूबाबत जवळच्या राष्ट्रांनी संमती दिली नाही. भारताची बांगला देश व नेपाळच्या संदर्भातील संबंधात मात्र चांगली सुधारणा दिसली. त्याचबरोबर भारताचे चीनशी चांगले संबंध सुधारले. हिंदी

महासागराबाबत प्रश्नांचा वाद सोडता वरिष्ठ शक्तींकडून जलमार्ग बांधणी सुरू करण्यात आली. त्यापरी असमतोल, तेलपुरवठा करणाऱ्या राष्ट्रामधील गंभीर स्थिती, रशियाच्या आत्मविश्वासामध्ये वृध्दी, अमेरिकन धोरणामधील कठोर स्वतंत्र भूमिका, जगातील बँक पत धोरणाबाबत अटळ असणारा लढा व या सर्वांपेक्षा स्वदेशात सर्वात भयावह रूप धारण केलेली राजकीय परिस्थिती यासर्व घटकांच्या दबावाखाली व त्यांच्या संभाव्य परिणामामुळेच जुन्या प्रस्तापित राजकीय रूढी सोडून नवीन शासन व्यवस्था किंवा नेतृत्व दुसरी नवीन धोरणे अवलंबू शकले नाही.

थोडक्यात अंतर्गत व बाहय ह्या दोन्ही राजकीय घडामोडीत असा ठसा उमटला की तो नाकारता आला नाही, की ज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेबाबत दिलेली घोषणा ही आकर्षक आणि विधायक ठरली नाही. देशासमोरील उद्‌भवणाऱ्या समस्या आणि त्यावर उपाय शोधण्यातच सरकार गुंतून पडले. नेतृत्वाची प्रबळ प्रतिमा ही पोकळ आश्वासनामुळे कमी झाली. आंध्रप्रदेश, बिहार, राजस्थान, गुजरात या राज्यांतील नेतेमंडळींतील असंतोष ही चर्चेची बाब ठरली. राज्याराज्यात सुसंगती निर्माण करण्यास केंद्रीय नेतृत्व अपयशी ठरले.

सुसंघटीतपणाच्या दुबळेपणामुळे सुधारणा व धोरणे यासाबत निष्क्रियता वाढली. आर्थिक विकासाला गती देणारी पंचवार्षिक योजना विस्कळीत झाली. शिवाय अंतर्गत संरक्षण व्यवस्थेतील समस्या, कायदा आणि सुव्यवस्था परिस्थितीमध्ये पारंपारिक रूढीवर विसंबल्यामुळे गंभीर स्वरूप धारण झाले. सर्वत्र गोंधळ माजला. मुलभूत सामाजिक सुधारणा आणि संस्थात्मक संशोधन समस्येवर नवीन दिशा देण्यात सरकार असफल झाले. राष्ट्रीय दिशा मिळण्याच्या दृष्टीने सरकारी इच्छा व कृती प्रांजळपणे शोधावी की ज्यामुळे अतिरिक्त

अपेक्षा व कृती या एकसंघ होतील अशा गोष्टींना खीळ बसली. सर्वात वाईट गोष्ट म्हणजे राजकीय व आर्थिक गोष्टीतील असंघटीतपणामुळे बिघडलेल्या व्यवस्थेला मात्र देशातील गरीब लोकांना किंमत मोजावी लागली. श्रीमती इंदिरा गांधींचे वैयक्तिक अपयश व त्यांच्या पक्षाची संघटीत अकार्यक्षमता हे ~~भारतीय राजकारणातील मोठ्या प्रमाणातील अपुरेपणाचे स्पष्ट स्पष्ट करणारे~~ नाट्यमय इशारे ठरले.

अशाप्रकारे १९८० ते १९८४ या काँग्रेस सरकारच्या कारकिर्दीत देशामध्ये अनेक सामाजिक, आर्थिक व राजकीय बदल झाले. याचा सर्व परिणाम १९८४ च्या सार्वत्रिक निवडणूकीवर झाला. राजकीयदृष्ट्या विचार केला तर या काळात प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वाढला, मुख्यत: कर्नाटकमध्ये जनता पक्ष, आंध्र प्रदेशात तेलगू देसम, पूर्व भारतात कम्युनिस्ट पक्ष, तामिळनाडूमध्ये अखिल भारतीय आण्णा द्रमुक पक्ष, जेम्मू काश्मिरमध्ये . नॅशनल कॉन्फरन्स या प्रादेशिक पक्षांचे भारतीय राजकारणात प्रभाव वाढला याचे कारण प्रादेशिक विभागात स्फूर्ती निर्माण करण्यास काँग्रेस अपयशी ठरला. अनेक राज्यामध्ये काँग्रेसची सरकारें होती, त्यांना केंद्रीय नेतृत्वावर अवलंबून रहावे लागले. या काळात हिंदी भाषा बोलणा-या पट्ट्यामध्ये वेगळी अस्मिता निर्माण झाली.

या राजकीय समस्येबरोबरच या काळात १९७८ च्या तुलनेने किंमतीमध्ये दुप्पट वाढ झाली, बेकारीची आर्थिक समस्या निर्माण झाली. दहशतवाद आणि प्रादेशिक असमतोल वाढला. विशेषत: आसाम आणि पंजाबमध्ये आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. सिक्कीम मधील नुरबहादूर भंडारी यांचे सरकार, जम्मू-काश्मिर मधील फारूक अब्दुल्ला यांचे सरकार, आंध्रमधील रामाराव यांचे सरकार कोसळण्यास काँग्रेस जबाबदार ठरले. या सर्व कारणामुळे लोकांच्यात असंतोष पसरला. याच काळात पंजाबमध्ये सुवर्णमंदिरात लष्कर घुसविले गेले आणि पंजाबी लोकांची धार्मिक भावना दुखावली गेली.

याची परिनीती इंदिरा गांधींच्या हत्येमध्ये झाली. अशा परिस्थितीत विरोधकांना यशाची खात्री वाटत होती, परंतु इंदिरा गांधींच्या हत्येमुळे निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या वातावरणात १९८४ च्या निवडणूका झाल्या आणि त्याचा फायदा काँग्रेसला मिळाला.

१९८४ च्या लोकसभा निवडणूकांच्या परिणामांचा अभ्यास करण्यापूर्वी अनेक पक्षांनी निवडणूक लढविली त्यांच्या ध्येयधोरणाचे व आश्वासनांचे स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे.

## - १९८४ ची सार्वत्रिक निवडणूक :-

| पक्ष | राजकीय धोरण | सामाजिक धोरण | आर्थिक धोरण | परराष्ट्रीय धोरण |
|---|---|---|---|---|
| कॉंग्रेस [आय] | १] राष्ट्रीय एकात्मता<br>२] स्थिर व स्वच्छ प्रशासन.<br>३] भ्रष्टाचार निर्मूलन.<br>४] केंद्र व राज्य संबंध करण्याचा प्रयत्न. | १] अल्पसंख्यांकाचे धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार सुरक्षित राखले जातील.<br>२] अल्पसंख्यांकांच्या अंतर्गत कायद्यात हस्तक्षेप केला जाणार नाही.<br>३] उर्दू भाषेस प्राधान्य.<br>४] मागासवर्गीय जाती-जमाती अध्यापनासाठी खास कार्यक्रम.<br>५] इ.स. २००० पर्यंत जननदर खाली आणणे. "आम्ही दोन आमचे दोन" प्राधान्य. ६ ते १४ वयोगटातील मुलांमुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण. मुलांचा शारिरीक व बौध्दिक दर्जा वाढ-विण्याचा प्रयत्न.<br>६] मागासवर्गीयांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय कल्याणासाठी प्रयत्न.<br>७] ग्रामिण भागासाठी स्वच्छ पाणीपुरवठा<br>८) भारतीय संस्कृती व परंपरांचा वारसा जोपासणे. | १] समाजवादी समाजरचना<br>२] गरीबी निर्मूलन, शेती व उद्योग-धंद्यांचा वेगाने विकास ही नियो-जनाची मुख्य उद्दीष्टये.<br>३] कृषी उत्पादकता वाढ व रोजगार निर्मिती यावर भर.<br>४] ग्रामिण रोजगार निर्मितीचा कार्यक्रम.<br>५] उद्योगांच्या तांत्रिक प्रगतीस व आधुनिकीकरणावर भर.<br>६] संपत्तीचा अधिकार कमी करण्याचा प्रयत्न.<br>७] कर भरण्यासंबंधीची अनामत रक्कम बंद करणे. | १] अणुयुध्द सदृश्य परिस्थि-तीशी मुकाबला करण्या-साठी पक्ष जगामध्ये महत्वाची भुमिका बजावले.<br>२]अरब व इतर राष्ट्रांशी मैत्री सलोख्याचे संबंध.<br>३] साम्राज्यवाद, वसाहतवाद यांच्या विरुध्दच्या लढ्याला भारत पाठिंबा देईल.<br>४] पॅलेस्टाईन मुक्तीलढ्यास पाठिंबा. |
| कॉंग्रेस [एस] | १] सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येणे.<br>२] संयुक्त सरकारच देश बळकट करु शकते.<br>३] केंद्र आणि राज्य संबंध समान्तेचे व सहकार्याचे.<br>४] लोकशाही संरक्षणासाठी सर्व विरोधी पक्षाने एकत्र यावे.<br>५] राजकारण आणि न्याय-व्यवस्थेतील भ्रष्टाचार निर्मुलना-साठी लोकपाल व लोकायुक्तांची नेमणूक करणे. | | १] उपभोग्य वस्तूंची उत्पादन वाढ.<br>२] सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यक्रम करणे.<br>३] काळ्या पैशामुळे निर्मित समस्या-हीस प्रतिबंध करण्यासाठी एकात्मिक धोरणाचा अवलंब केला जाईल.<br>४] कामाच्या प्रमाणांतच वेतन. | १] अलिप्ततावादाचे समर्थन.<br>२] सर्व बाबतीत आंतरराष्ट्रीय संबंध चांगले ठेवण्याचा प्रयत्न<br>३] भारतीय समुद्र शांतता पट्टा जाहीर.<br>४] शेजाऱ्यांशी मैत्रीपूर्ण संबंध.<br>५] अरब राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध. |

४

| पक्ष | राजकीय धोरण | सामाजिक धोरण | आर्थिक धोरण | परराष्ट्रीय धोरण |
|---|---|---|---|---|
| जनता पक्ष | १] कामाच्या हक्काचा मुलभूत हक्कात समावेश. | १] सर्व कुटुंबांना अन्न पुरवठा. | १] रोजगार हमी योजनेची स्थापना व प्रत्येकाला रोजगार दिला जाईल. | १] आंतरराष्ट्रीय शांतता व जागतिक विकास यासाठी प्रयत्न. |
| | २] अल्पसंख्यांकासाठी खास आयोग निर्मिती. | २] बंद पडलेल्या गिरण्या सुरू करणे. | २] बँकांकडून कर्जपुरवठा. | २] अलिप्ततावादास विरोध करणा-यास प्रतिबंध. |
| | ३] आकाशवाणी व दूरदर्शन यास स्वायत्तता. | ३] वेठ बिगारांची मुक्तता केली जाईल. | ३] कर म्हणजे अनावश्य व चैनीच्या वस्तुवर मर्यादा. | ३] दक्षिण-उत्तर परिसंवादामध्ये सक्रिय सहभाग. |
| | ४] त्वरित न्याय व न्यायसंस्थेत संस्थात्मक बदल. | ४] १४ वर्षे पर्यंतच्या सर्व मुलांना पुरेसा आहार. | ४] उत्पन्नातील विषमता कमी करून मुलभूत उदयोगाचा विकासावर भर | ४] प्रदेशवाद, वसाहतवाद व नववसाहतवाद या नितीला विरोध. |
| | ५] नागरी स्वातंत्र्याची हमी. | ५] एक वर्षाच्या आत दलित व हरिजनांना अतिरिक्त जमिनीचे वाटप. | ५] दूध व वन उत्पादनाला योग्य किंमती. | |
| | ६] निवडणूक व्यवस्थेची पुनर्रचना, भ्रष्टाचारास आळा. | ६] पाच वर्षात सर्वांना पिण्याचे पाणी पुरविणे. | ६] किफायतशीर किंमतीत शेती अवजारे पुरवठा. | |
| | ७] सामाजिकदृष्टया असुरक्षित राज्यासाठी खास कायदयाची तरतूद. | ७] सक्तीचे प्राथमिक शिक्षण केले जाईल. | ७] परवाना धोरणाची पुनर्रचना. | |
| | ८] मतदार वय १८ पर्यंत खाली आणणे. | ८] १०००० लोकसंख्येला एक आरोग्य केंद्र. | ८] कोरडवाहू शेतीसाठी नफा तंत्राचा अवलंब. | |
| | ९] पक्ष व उमेदवाराची निवडणूक खर्च बंधनात. | ९] व्यक्तीच्या धार्मिक स्वातंत्र्यात प्रशासन व राज्यसरकार यांना हस्तक्षेप करू दिला जाणार नाही. | | |
| | १०] केंद्र व राज्य परस्परांच्या व्यवहारात हस्तक्षेप करणार नाहीत याची हमी. | १०] मंडळ आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी. | | |
| | ११] न्याय व्यवस्था व वृत्तपत्रे यांच्या स्वातंत्र्याची हमी. | ११] स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन. | | |
| | | १२] पेन्शनरांच्या प्रश्नावर खास लक्ष. | | |

| पक्ष | राजकीय धोरण | सामाजिक धोरण | आर्थिक धोरण | परराष्ट्र धोरण |
|---|---|---|---|---|
| दलित मजदूर किसान पक्ष. | १] कंत्राटात कसूर करणाऱ्या विरुद्ध कडक कार्यवाही. | १] मागासवर्गीयासाठी मंडल आयोगाची अंमलबजावणी. | १] शेती क्षेत्रात अधुनिक साधनांचा उपयोग. | १] अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार. |
| | २] राजकीय कारणासाठी राज्य निधीची उभारणी व त्यानुसार राजकीय पक्षांची हिशोब तपासणी. | २] अंतरजातीय विवाह करणाऱ्यास नोकरीमध्ये प्राधान्य. | २] कसणाऱ्याची जमीन जमिनदारी पध्दतीचे निर्मूलन, शेतीतून जास्तीत जास्त लोकांना रोजगार निर्माण करणे. | २] अंतरराष्ट्रीय शांतता राखण्यास प्रयत्न. |
| | ३] काळ्या पैशाचा निपःत केला जाईल. | ३] हरिजन व आदिवासींची बळकावलेली जमीन परत देण्यात येईल. | ३] गरीबी व बेकारी दुर करण्यासाठी शेतीवर भर दिला जाईल. | ३] तिसऱ्या जगातील राष्ट्रबरोबर मैत्रिचे व सहकार्याचे संबंध राखणे. |
| | ४] निवडणूक आयोग, वृत्तपत्र, आकाशवाणी दुरदर्शन यांना स्वातंत्रता. | ४] स्त्रियांना शेत कायद्याद्वारे संरक्षण. | ४] तोट्यात चालणारे सरकारी उद्योग बंद | ४] शेजारी राष्ट्राबरोबर मैत्री प्रस्थापित करणे. |
| | ५] बहुसदस्य निवडणूक आयोगाची निर्मिती. | ५] बलात्कार व हुंड्यासाठीचे कायदे कडक करणे. | ५] नफेखोरावर जास्त दराने कर आकारणी. | |
| | ६] मंडल आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी. | ६] वृध्द, आजारी, अपंग, निराधार अशा लोकांसाठी भक्कम सामाजिक विमा आखणी. | ६] कर गोळा करण्याच्या व्यवस्थेतील भ्रष्टाचार निपटून काढला जाईल. | |
| | ७] जात व धर्म यांचा राजकारणात वापर करणाऱ्या विरुध्द कडक कार्यवाही. | ७] लग्न झाल्यानंतर १० वर्षात अनैसर्गिक मृत्यु आलेल्या स्त्रीची चौकशी व गुन्हेगाराला कडक कार्यवाही केली जाईल. | ७] करव्यवस्था उत्पन्नाकडून उपभोगाकडे वळविली जाईल, कर चुकविणाऱ्या विरुध्द कडक कार्यवाही. | |
| | ८] आंतरराष्ट्रीय संघर्ष मिटविण्यासाठी एका शांत आयोगाची नियुक्ती. | | | |

| पक्ष | राजकीय धोरण | सामाजिक धोरण | आर्थिक धोरण | परराष्ट्र धोरण |
|---|---|---|---|---|
| भारतीय जनता पक्ष. | १] राष्ट्राला नवीन सरकार, नवीन धोरण नवीन नेतृत्व देण्यात येईल. | १] स्वातंत्र्यसैनिक, अनुसूचित जाती आणि जमातीतील स्त्रिया व मुले यांच्यासाठी खास कार्यक्रम. | १] स्वदेशीवर भर आणि परकीय मदत बंद. | १] अलिप्ततावाद हा भारताच्या परराष्ट्रधोरणाचा मुख्य आधार असेल. |
| | २] मूल्यावर आधारीत राजकारण, धर्मनिरपेक्षता आणि गांधीवादी अर्थव्यवस्था यावर भर. | २] राष्ट्राच्या विकासासाठी कुटुंबनियोजन कार्यक्रम राबविला जाईल. | २] कसणा-याला जमीन. | २] महासत्तांची ताकद कमी करण्याचा प्रयत्न. |
| | ३] गुन्हेगार व भ्रष्टाचाराविरुद्ध कडक धोरण. | ३] गरीब लोकांसाठी अंत्योदय कार्यक्रम स्वीकारला जाईल. | ३] उद्योगधंद्यांना मोकळीक. | ३] शेजारी राष्ट्रांशी शांततेचे सलोख्याचे आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित केले जातील. |
| | ४] लोकशाहीत सांप्रदायिकता, जातीयता व धर्म यांना स्थान दिले जाणार नाही. | | ४] आर्थिक प्रवाह मुक्त करून किंमत नियंत्रण. | |
| | ५] भारतीयीकरणावर जास्त भर. | | ५] व्यवस्थापन आणि लाभ यामध्ये मजुरांना सहभाग. | |
| | ६] हिंदी राष्ट्रभाषा, गोहत्याबंदी, एक केंद्र शासन सर्वांसाठी सर्वत्र समान मुलकी कायदा. | | ६] बेकारांना आर्थिक सहाय्य. | |
| | ७] जमातवाद व मुस्लिम सांप्रदायवादास विरोध. | | ७] बँकांचे राष्ट्रीयकरण. | |
| | ८] केंद्र आणि राज्य यांच्या संबंधात समतोल घटक राज्यांना अधिक आर्थिक अधिकार दिले जाते. | | ८] रोजगाराची पूर्ण हमी. | |
| | ९] घटनेतील ३७० हे कलम रद्द केले जाईल. | | ९] पुरेसे उत्पादन आणि किंमती स्थिर ठेवण्याची हमी. | |
| | १०] मतदाराचे वय १८ करणे, व प्रत्येक मतदाराला ओळख पत्र दिले जाईल. | | १०] शेतीसाठी आवश्यक साधनांचा पुरवठा. | |
| | ११] निवडणूक पद्धतीत बदल करून निवडणूक प्रक्रियेत आधुनिक साधनांचा वापर केला जाईल. | | ११] ३०,०००/- रु. उत्पन्नदाराकडून उत्पन्न करात सूट. | |
| | १२] राष्ट्राच्या एकतेवर घाला घालण्याच्या कृती सहन केल्या जाणार नाहीत. | | १२] नोकरवर्गांना वेतन व इतर सर्व सवलतींची पूर्ण हमी. | |
| | | | १३] देशात कोणीही गरीब राहणार नाही याची काळजी घेण्यात येईल. | |

| पक्ष | राजकीय धोरण | सामाजिक धोरण | आर्थिक धोरण | परराष्ट्रीय धोरण |
|---|---|---|---|---|
| भारतीय कम्युनिस्ट पक्ष. | १] केंद्र राज्य संबंधाची पुनर्रचना करणे, राज्यांच्या अधिकारात वाढ, त्यांना विकासासाठी आवश्यक ती साधने पुरविणे. | १] ग्रामीण आणि शहरी गरीबांना घरांसाठी मोफत जागा देणे. | १] परकीय व्यापार, मक्तेदारी कंपन्यांचे राष्ट्रीयकरण. | १] साम्राज्यवादाविरोधी धोरणाचा अवलंब. |
| | २] मतदाराचे वय २१ वरून १८ वर आणणे. | २] प्राथमिक आणि माध्यमिक पातळी पर्यन्तचे शिक्षण मोफत आणि सक्तीचे करणे. | २] अन्नधान्याच्या घाऊक व्यापारावर बंदी. | २] शांतता व अलिप्ततावादाचा स्वीकार. |
| | ३] न्यायव्यवस्था, केंद्र आणि राज्यपातळीवरील भ्रष्टाचार निपटून काढणे, भ्रष्टाचारी मंत्र्यावर कारवाई करणे. | ३] कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यासाठी शिक्षण भत्ता व वसतिगृहाची सोय. | ३] जीवनावश्यक वस्तूंचे योग्य दराने वितरण. | ३] रशियाबरोबर मैत्रीचे व सहकार्य धोरण अवलंबिणे. |
| | ४] हरिजन व आदिवासींचे अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ते कायदे करणे. | ४] मुस्लिम व इतर अल्पसंख्यांकाचे अधिकार सुरक्षित. | ४] शेतकऱ्यांना किफायतशीर किंमतीची हमी. | ४] समाजवादी राष्ट्राबरोबर मैत्रीचे धोरण. |
| | ५] संसदीय लोकशाही मजबूत करणे. | ५] सामाजिक असंतोष पसरले अशा प्रचारावर बंदी. | ५] श्रीमंतावर कर आकारून विकासाची साधने गोळा करणे. | ५] आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधीची न्याय आणि समता या तत्वावर पुनर्रचना. |
| | ६] लोकांच्या लोकशाही अधिकारात वाढ, कामकरी वर्गाच्या अधिकाराचे संरक्षण. | ६] धर्मनिरपेक्षता तत्वाचा अवलंब. | ६] कुटीर व लघुउद्योगांना संरक्षण व प्रोत्साहन. | ६] नववसाहतवादाविरोधी धोरण. |
| | ७] स्त्रियांचा राजकीय दर्जा वाढविण्यासाठी त्यांच्या अधिकारात वाढ. | ७] स्त्रियांना समान वेतन, दर्जा आणि संधी उपलब्ध करून देणे, आई वडिलांच्या संपत्तीत अधिकार. | ७] गरजेवर आधारीत किमान वेतन देणे. | ७] अमेरिकेच्या अणुबॉम्ब विषयक धोरणाला विरोध. |
| | ८] काँग्रेस पक्षाच्या धोरणाला विरोध. | ८] हरिजन व आदिवासींचे अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी योग्य उपाययोजना. | ८] टाळेबंदी, कारखाने बंद व वेतन गोठविणाऱ्यावर कडक कार्यवाही. | |
| | ९] राष्ट्राची एकता आणि अखंडता राखण्यासाठी प्रयत्न. | ९] मोफत आरोग्य सेवा. | ९] बंद गिरण्या ताब्यात घेणे. | |
| | | | १०] कामगारांना व्यवस्थापनात सहभाग. | |
| | | | ११] शेतीमध्ये काम करणाऱ्यांना जमीनीची हमी दिली जाईल. | |
| | | | १२] घटनेतील मुलभूत हक्कात काम करण्याच्या हक्काचा समावेश. | |

६७

| पक्ष | राजकीय धोरण | सामाजिक धोरण | आर्थिक धोरण | परराष्ट्रीय धोरण |
|---|---|---|---|---|
| मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष [सी.पी.आय.एम] | १] केंद्र आणि राज्य संबंधाची लोकशाही मार्गांनी पुनर्रचना, घटकराज्यांना जास्त अधिकार देणे. | १] उच्च माध्यमिक पातळीपर्यंतचे शिक्षण मोफत. | १] नियोजनाला प्राधान्य. | १] अलिप्ततावादी चळवळीचा पाठपुरावा. |
| | २] राष्ट्रीय एकतेसाठी जोरदार प्रयत्न. | २] नोकरीसंदर्भात वर्गीकृत जातीचा विचार. | २] मांडवलदारी, जमीनदारी व मक्तेदारी यांचे राष्ट्रीयकरण. | २] साम्राज्यवादास विरोध आणि साम्यवादी राष्ट्राशी मैत्री हा परराष्ट्र धोरणाचा पाया. |
| | ३] विघटनवादी चळवळीला प्रतिकार. | ३] सर्व भाषा व भाषीक गटांना समान दर्जा. | ३] सुती कापड व ताग गिरण्या यांचे राष्ट्रीयकरण. | |
| | ४] जातीय शक्तीशी हात मिळविणी करणाऱ्या पक्षांना विरोध. | ४] साम्यवादी शिक्षणाला अग्रक्रम. | ४] औद्योगिक, शेती आणि मध्यमवर्गीय याठिकाणी काम करणाऱ्यांना कमी भाडे आकारणे. | |
| | ५] निवडणूकीतील जातीवादी संघटनेच्या हस्तक्षेपाला विरोध करणे. | ५] शिक्षण या घटकाचा राज्यसूचित समावेश. | ५] कामगारसंघटनांना पूर्ण स्वातंत्र्य. | |
| | ६] राष्ट्रातील फुटीरवादी शक्तीच्या कारवाईला आळा. | ६] युवक व विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे लक्ष. | ६] ग्रामीण आणि शहरी भागातील बेरोजगारांना बेकार भत्ता देणे. | |
| | | ७] स्त्रियांची पिळवणूक थांबविणे व पुरुषाबरोबर संपत्तीचा अधिकार दिला जाईल, समान कामासाठी समान वेतनाची तरतूद. | ७] लोकांना कमी किंमतीत अन्नधान्याचा पुरवठा करणे. | |
| | | ८] मुस्लिम आणि इतर अल्पसंख्यांक यांची हिंदुत्ववाद्यांकडूनची पिळवणूक थांबविणे. | ८] शेतक-यांसाठी शेतजमिनीच्या किंमती कमी केल्या जातील. | |
| | | ९] जातीयवादी शक्ती पूर्णपणे नष्ट केल्या जातील. | | |

## १९८४ च्या लोकसभा निवडणूक जाहिरनाम्याचे विश्लेषण

१९८४ च्या निवडणुकीची पूर्वीची राजकीय, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी लक्षात घेता मतदार वर्तनावर प्रस्तापित परिस्थितीचा फार मोठा प्रभाव पडला. सामान्यपणे पंजाब प्रश्न, आसाम आंदोलन, काश्मिर प्रश्न, मिझो, नागालँड, झारखंड, बोडो आंदोलन, नक्षलवादी कारवाया इत्यादी प्रश्नांमुळे राष्ट्रांच्या एकसंघ अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यातच पंजाबमध्ये सुवर्णमंदिरात लष्कर घुसविल्यामुळे पंजाबी अतिरेक्याकडून प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली आणि राष्ट्रापुढे अस्तित्वाचा प्रश्न आ वासून उभा राहिला. याचा परिणाम निवडणुकीवर झालेला दिसून येतो. परंतु राजकीय पक्षांनी या निवडणुकीसाठी घोषित केलेल्या जाहिरनाम्यांचा मतदार वर्तनावर कितपत प्रभाव पडला यांचा आढावा घेऊ.

### राजकीय धोरण -

#### काँग्रेस -

१९८४ निवडणुकीत घोषित केलेल्या जाहिरनाम्यात काँग्रेस पक्षाने राष्ट्रातील फुटीर शक्ती, प्रादेशिक कारवाया आणि अशासारख्या अनेक समस्यांना समर्थपणे तोंड देण्यासाठी आवाहन केले आहे. त्यासाठी काँग्रेसने राष्ट्राची एकता आणि अखंडता कायम राखली जाईल. स्थिर व स्वच्छ प्रशासनाची हमी दिली जाईल, केंद्र-राज्य संबंध मजबूत केले जातील, भ्रष्टाचाराचे निर्मुलन केले जाईल. या धोरणांना प्राधान्य दिले.

काँग्रेस पक्षाप्रमाणेच काँग्रेस [एस], जनता पक्ष, दलित मजदूर किसान प क्ष भाजप, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष इत्यांनी वरील गोष्टींचा आपल्या जाहिरनाम्यात उल्लेख केलेला होता. परंतु या पक्षांनी काँग्रेस पक्षापेक्षा वेगळ्या स्वरूपाच्या राजकीय धोरणांची घोषणा केली आहे.

काँग्रेस [एस] -

१९८४ च्या निवडणुकीत काँग्रेस [एस] या पक्षाने राजकीय सुधारणा करण्याच्या दृष्टीने संयुक्त सरकारच देश बळकट करील त्यासाठी संयुक्त सरकार निर्मितीवर भर देणे आणि राजकारण व न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी लोकपाल व लोकायुक्तांची नियुक्ती केली जाईल अशाप्रकारची आश्वासने दिली.

जनता पक्ष -

जनता पक्षाने राजकीय धोरणाच्या बाबतीत नागरी स्वातंत्र्याची हमी देणे, निवडणूक व्यवस्थेची पुनर्रचना करणे आणि निवडणुकीतील भ्रष्टाचारास आळा घालणे, मतदाराचे वय १८ करणे इत्यादी घोषणा ह्या काँग्रेस पक्षापेक्षा वेगळ्या स्वरूपाच्या मांडलेल्या आहेत.

दलित मजदूर किसान पक्ष -

१९८० च्या निवडणुकीसाठी घोषित केलेल्या जाहिरनाम्यात या पक्षाने राजकीय कारणासाठी राज्यनिधिची स्थापना करणे, निवडणूक आयोग, वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन यांना स्वायत्तता, मंडल आयोगाची अंमलबजावणी, आंतरराज्यीय प्रश्न सोडविण्यासाठी खास आयोग इत्यादी धोरणे ही काँग्रेस व इतर पक्षांच्या राजकीय धोरणापेक्षा वेगळी आहेत.

भारतीय जनता पक्ष -

भारतीय जनता पक्षाने राष्ट्राला नवीन सरकार, नवीन नेतृत्व, नवीन धोरण देण्याचे आश्वासन दिले शिवाय भारतीयीकरणावर भर, समान नागरी कायदा, जमातवाद व मुस्लिम सांप्रदायास विरोध, घटनेतील ३७० वे कलम रद्द करण्याची हमी इत्यादी राजकीय धोरणांचा अवलंब केला.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांची राजकीय धोरणे भारतीय जनता पक्ष वगळता इतर पक्षांशी समान आहेत.

या निवडणुकीसाठी जाहिर केलेल्या राजकीय धोरणामध्ये सर्व पक्षांनी राष्ट्राची एकता आणि अखंडता राखण्यासाठी आदर्श व आकर्षक धोरणांची मांडणी केली परंतु इंदिरा गांधींच्या हौतात्म्यामुळे परिस्थिति व गटांनी प्रभावित मतदार सहानुभूतीपोटी कॉंग्रेस पक्षाकडे आकर्षित गेले. शिवाय भारतीय मतदारांनी या निवडणुकीत मतदान करतांना सर्व राजकीय समस्यांकडे दुर्लक्ष केलेले दिसून येते कारण यावेळी सहानुभूतीच्या वातावरणात निवडणुका झाल्या आणि त्याचा फायदा कॉंग्रेस पक्षाला मिळाला.

## २. सामाजिक धोरण

१९८४ च्या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी घोषित केलेल्या जाहिरनाम्यात सामाजिक विकासासाठी कोणकोणत्या कार्यक्रमांचा अवलंब केला आहे याचा आपण आढावा घेऊ.

### धर्मनिरपेक्षता

सामाजिक सुधारणेसाठी धर्मनिरपेक्षता या तत्वाचा सर्व राजकीय पक्षांनी पुरस्कार केला आहे. त्यासाठी कॉंग्रेस पक्षाने जातीयवादी शक्तीपासून धार्मिक स्थळांचे रक्षण करणे, जनता पक्षाने प्रत्येकाच्या धार्मिक स्वातंत्र्यात हस्तक्षेप केला जाणार नाही आणि दंगलप्रतिबंधक दल स्थापन करण्यात येईल, भारतीय जनता पक्षाने सांप्रदायिकता, जातीयवाद व धर्म यांना लोकशाहीत स्थान दिले जाणार नाही, सर्वांसाठी समान मुलकी कायदा करण्यात येईल आणि मुस्लिम सांप्रदायिकता व जमातवादास विरोध केला जाईल, आणि कम्युनिस्ट पक्षांनी अल्पसंख्यांकांना संरक्षण देण्याची हमी देण्यात येईल अशाप्रकारच्या तत्वांचा अवलंब केला आहे.

## मागासवर्गीय व आदिवासी -

मागासवर्गीय व आदिवासींच्या विकासासाठी काँग्रेस पक्षाने मागासवर्गीयांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करून दिल्या जातील, हुंडा पध्दत व इतर समाज विघातक रूढी-परंपरांना विरोध, १९९४-९५ पर्यंत दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येची टक्केवारी ५० पर्यंत आणणे, जनता पक्षाने मंडल आयोगाची अंमलबजावणी पेन्शनरांच्या समस्येचे निराकरण, अतिरिक्त जमिनीचे एक वर्षाच्या आत मागासवर्गीयांना वाटप, मुलांच्या शोषणाला प्रतिबंध, भारतीय जनता पक्षाने अल्पसंख्यांक समिती ऐवजी मानवी हक्क समिती नेमण्यात येईल, मागासवर्गीयासाठी खास कार्यक्रम आखणे, दलित मजदूर किसान पक्षाने मंडल आयोगाची अंमलबजावणी, आंतरजातीय विवाह करणाऱ्यांसाठी नोकऱ्यामध्ये प्राधान्य, मागासवर्गीयावरील अत्याचारांवर न्याय देण्यासाठी स्वतंत्र न्यायालयाची स्थापना करण्यात येईल. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने मागासवर्गीयांचे अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी उपाययोजना केली जाईल. भा.क.प.ने मागासवर्गीयासाठी उच्च व माध्यमिक शिक्षण मोफत देण्यात येईल आणि त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्यास कडक शिक्षा देण्यात येईल. अशाप्रकारच्या धोरणाला राजकीय पक्षांनी स्वीकार केला आहे.

## स्त्रिया व मुले

सर्वच राजकीय पक्षांच्या सामाजिक धोरणात स्त्रिया आणि मुले यांच्या विकाससंदर्भात एकमत असल्याचे आढळते. स्त्रियांना आर्थिक, सामाजिक विकास व्हावा, त्यांना समान दर्जा आणि संधी प्राप्त व्हावी, स्त्रियांना संपत्तीचा अधिकार प्राप्त व्हावा यासाठी सर्व पक्षांनी हमी दिली आहे. दलित मजदूर किसान पक्षाने मात्र हुंड्यासाठी कडक कायदे करण्याची आणि लग्नानंतर एखादा स्त्रीला १० वर्षाच्या आत अनैसर्गिक मृत्यू आल्यास त्याची चौकशी करण्याचे आश्वासन हे इतर पक्षांच्या तुलनेने वेगळे असे दिले आहे.

आरोग्य

देशामध्ये आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात सर्व पक्षांची विचारसरणी सारखी आहे त्यासाठी आरोग्य केंद्राची उभारणी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सर्वांना अन्नपुरवठा, कुटुंब नियोजन याबरोबर कॉंग्रेस पक्षाने पर्यावरण समतोल आणि दलित मजदूर किसान पक्षाने सामाजिक आरोग्य विमा योजना निर्माण करण्याची हमी या थोड्याशा वेगळ्या परंतु पुरक अशा घोषणा केल्या आहेत.

थोडक्यात राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यातील सामाजिक धोरणाचा तुलनात्मक विचार करता सर्वच पक्षांची धोरणे समान दिसतात. सामाजिक विकाससाठी या पक्षांनी पुरस्कार केलेल्या धोरणामध्ये थोडाफार फरक असला तरी त्यांचे उद्दीष्ट एकच असल्याचे दिसून येते. या धोरणात भारतीय जनता पक्षाचा समान नागरी कायदा, व जनता पक्ष आणि दलित मजदूर किसान पक्ष यांचे मंडळ आयोगाच्या अंमलबजावणीचे आश्वासन काही अंशी धार्मिक व विशिष्टांच्यावर प्रभाव पाडणारे होते परंतु राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान करणाऱ्या भावनात्मक वातावरणामुळे ह्या गोष्टी प्रभावहीन ठरल्या.

३. आर्थिक धोरण

१९८४ च्या निवडणूकीत सहभागी झालेल्या राजकीय पक्षाचे जाहिरनामे बारकाईने अभ्यासले असता आपल्याला असे दिसून येईल की आर्थिक धोरणाच्या बाबतीत काही गोष्टींच्या संदर्भात सर्व राजकीय पक्षात समानता आढळते त्यामध्ये प्रामुख्याने गरीबी निर्मुलन, कृषीक्षेत्राचा विकास व आधुनिकीकरण रोजगार निर्मितीला चालना, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवणे, आर्थिक विषमता कमी करणे, कामाच्या प्रमाणात वेतन देणे, सार्वजनिक वितरणव्यवस्था कार्यक्षम करणे इत्यादी.

परंतु आर्थिक धोरणाच्या संदर्भात वरील सारखेपणा प्रमाणेच काही वेगळया धोरणाचा पुरस्कार केलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने काँग्रेस पक्षाने उद्योगधंद्याच्या तांत्रिक प्रगतीस व आधुनिकीकरणास वाव देण्यात येईल, कर भरण्यासाठी लागणारी अनामत रक्कम बंद करण्यात येईल. काँग्रेस [एस] भाववाढीस प्रतिबंध घालण्यात येईल. जनता पक्ष, कर सामान्य जनतेच्या वस्तूवर मर्यादा घालण्यात येईल, दलित मजदूर किसान पक्ष - शेतीतून रोजगार निर्मिती, तोट्यातील सरकारी उद्योग बंद करणे, करव्यवस्था उत्पन्नाकडून उपभोगाकडे वळविणे, भारतीय जनता पक्ष - स्वदेशीवर भर, उद्योगधंद्यांना मोकळीक, आर्थिक प्रवाह मुक्त केला जाईल, किंमती नियंत्रणात आणणे, ३०,००० रु. पर्यंत उत्पन्न करात सूट देणे, भा.क.प. - कुटीर व लघुउद्योगांना संरक्षण देणे, परकीय व्यापार व मक्तेदारी कंपन्यांचे राष्ट्रीयकरण करणे. भा.क.प. सुतीकापड व साग गिरण्यांचे राष्ट्रीयकरण, कामगार संघटनांना स्वातंत्र्य देणे. अशाप्रकारच्या काहीशा वेगळया आर्थिक धोरणांचा वरील पक्षांनी पुरस्कार केलेला आहे.

यावरून आर्थिक धोरणाच्या बाबतीत मतदारांना आकर्षित करून घेण्याचे सामर्थ्य कोणत्याच पक्षाच्या आर्थिक धोरणात नाही, कारण सर्वच राजकीय पक्षांची आर्थिक धोरणे ही काहीशी परंपरागत अशाच स्वरूपाची होती, शिवाय या निवडणुकीत राजकीय पक्षांच्या यशापयशाला आर्थिक धोरणापेक्षा राजकीय धोरणच जास्त प्रभावी ठरलेले आहे.

४. <u>परराष्ट्रीय धोरण -</u>

१९८४ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या जाहिर केलेल्या परराष्ट्रीय धोरणात, आंतरराष्ट्रीय शांतता, नि:शस्त्रीकरण, अलिप्तता व सर्व राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध प्रस्तापित करणे या बाबतीत सर्वच राजकीय पक्षाचे एकमत आहे. परराष्ट्रीय धोरणाचा मतदारवर्तनावर कोणत्याही पक्षाचा वेगळा ठसा उमटलेला नाही.

## १९८४ लोकसभा निवडणूक – विश्लेषण.

१९८४ च्या लोकसभा निवडणूकीत राजकीय पक्षांनी स्वीकारलेली धोरणे आणि कार्यक्रम यांचा मतदार वर्तनावर कितपत प्रभाव होतो हे शोधण्यापूर्वी तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती आणि त्या परिस्थितीचा या निवडणूकीवर कशाप्रकारे परिणाम झाला हे तपासून पाहणे संयुक्तिक ठरेल. राजकीय दृष्टीने विचार केला तर या काळात प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वाढला. मुख्यत: कर्नाटकमध्ये जनता पक्ष आणि आंध्र प्रदेशात तेलगू देशम या पक्षांचा उदय झाला. पूर्व भारतात भारतीय कम्युनिस्ट पक्ष, तामिळनाडूमध्ये अखिल भारतीय अण्णा द्रमुक पक्ष, जम्मू काश्मिर मध्ये नॅशनल कॉन्फरन्स पक्ष या पक्षांचा प्रभाव वाढला याचे कारण म्हणजे प्रादेशिक विभागात स्फूर्ती निर्माण करण्यास कॉंग्रेस अपयशी ठरला. अनेक घटकराज्यांमध्ये कॉंग्रेसची सरकारे होती, त्यांना केंद्रीय नेतृत्वावर अवलंबून राहावे लागले. तसेच या काळात हिंदी भाषा बोलणाऱ्या पट्ट्यामध्ये वेगळी अस्मिता निर्माण झाली आणि हा भाग भारतीय कराजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणारा ठरला.

आर्थिक स्थितीही या काळात तितकीशी समाधानकारक नव्हती. या काळात १९७८ च्या तुलनेने किंमतीमध्ये दुप्पट वाढ झाली. बेकारीची आर्थिक समस्या निर्माण झाली. दहशतवाद आणि प्रादेशिक असमतोल वाढला. विशेषत: आसाम आणि पंजाब मध्ये आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल. सिक्कीममधील नुरबहादूर भंडारी यांचे सरकार, जम्मू-काश्मिरमधील फारूक आब्दुल्ला यांचे सरकार, आंध्रमधील रामाराव यांचे सरकार कोसळण्यास कॉंग्रेस जबाबदार ठरले. या काळात सुवर्ण मंदिरात लष्कर घुसविले गेले आणि पंजाबी लोकांची धार्मिक भावना दुखावली. या सर्व कारणामुळे लोकांमध्ये असंतोष पसरला. अशापरिस्थितीत देशामध्ये कॉंग्रेस पक्षाविरोधी वातावरण तयार झालेलं होते, विरोधी पक्षांना अशाचीखात्री वाटत होती. केंद्रामध्ये संमिश्र सरकार स्थापन करता येईल असा विश्वास

विरोधी पक्षांमध्ये निर्माण झाला होता. सर्वच राजकीय पक्षांनी या निवडणुकीत आपल्या विचारसरणीची फेरजुळणी केली. जनता पक्ष आणि लोकदल यांनी जातीच्या राजकारणास सुरवात केली. लोकदलाने आपले नांव बदलून दलित मजदूर किसान पक्ष ठेवले, आपणच दीन दलित, कामगार, शेतकरी यांचे कल्याण करू शकतो, अशाप्रकारची प्रतिमा या पक्षाने निर्माण केली होती. भारतीय जनता पक्षाने गांधी मार्गाचा त्याग करून आक्रमक हिंदुवादी पवित्रा घेतला. या चार वर्षांच्या कालावधीमध्ये जनता पक्ष, भा. ज. प. आणि लोकदल यांनी ठोस कार्यक्रमाच्या आधारे आपली प्रतिमा उजळ करण्याचा प्रयत्न केला. अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक समस्यां-विरुद्ध निकराचा लढा दिला. परंतु याच काळात सुवर्ण मंदिरात लष्कर घुसविण्याच्या कारणावरून पंजाबी अतिरेक्यांनी श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या केली. सर्व देशभर सहानुभूतीची लाट पसरली. या वातावरणात निवडणुका पार पडल्यामुळे त्याचा फायदा निश्चितच कॉंग्रेस पक्षाला मिळाला. हे निवडणूक निकालावरून स्पष्ट दिसून येते.

<u>तक्ता क्र. ७</u>

१९८४ च्या लोकसभा निवडणूक निकाल.

| पक्ष | जिंकलेल्या जागा | मतांची टक्केवारी. |
|---|---|---|
| कॉंग्रेस आय | ४०१ | ४९.१७ |
| तेलगू देसम | २८ | ४.१ |
| भा. क. प. | २२ | ५.९ |
| आण्णा द्रमुक | १२ | ५.९१ |
| जनता पक्ष | १० | १३.१ |
| भा. क. प. | ६ | २.७ |
| कॉंग्रेस [एस] | ४ | – |
| नॅशनल कॉन्फरन्स | ३ | – |
| द. म. कि. प. | ३ | – |
| भा. ज. प. | २ | ७.९ |
| कॉंग्रेस [जे] | १ | – |
| डी. एम. के. | १ | – |
| स्वतंत्र व इतर | १७ | २१.५५ |

१९८४ च्या निवडणूक निकालाची इतर निवडणूक निकालाशी तुलना करता या निवडणूकीत काँग्रेस पक्षाने भारताच्या निवडणूक इतिहासामध्ये सर्वात जास्त जागा जिंकल्या आहेत. शिवाय १९८० च्या निवडणूकीपेक्षा या निवडणूकीत काँग्रेस पक्षाच्या जागेच्या संख्येत वाढ झाली आहे. इतर विरोधी पक्षांची स्थिती कमकुवत झालेली दिसते. याचे कारण या निवडणूकीत काँग्रेस पक्षाला सहानुभूतीच्या वातावरणाचा फायदा मिळाला आहे. एकूण निवडणूक निकालावरून असे स्पष्ट होते की, या निवडणूकीत काँग्रेस पक्षाला मिळालेला अद्भुत विजय आणि विरोधी पक्षांची वाताहत ही त्या त्या पक्षांच्या धोरणात्मक प्रतिमेवर नसून काँग्रेसला मिळालेल्या सहानुभूतीवर होती असे निश्चितपणे सांगता येईल. तरी मागील प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणे प्रा. सिरसीकरांच्या मतानुसार राजकीय पक्षांच्या धोरणांना, कार्यक्रमांचा आणि जाहिरनाम्यांचा मतदारवर्तनावर किती प्रभाव पडला हे तपासून पाहू.

१] परिवर्तनशील मतदार

२] गटांनी प्रभावित मतदार.

ह्या दोन गटांच्या बाबत जाहिरनामे, धोरणे आणि कार्यक्रम यांचा परिणाम होऊन बदल आढळतो.

वरील गटांची निश्चिती -

काँग्रेस - % मतदान फरक

| | | | |
|---|---|---|---|
| १९७७ | ३४.५ | १९७७ ते ८० | = + ८ % |
| १९८० | ४२.४३ | १९८० ते ८४ | = + ६ % |
| १९८४ | ४८.१ | | |

∴ यावरून १९८०, १९८४ मध्ये अनुक्रमे + ८ %, + ६ % आढळणारा फरक म्हणजे परिवर्तनशील किंवा गटांनी प्रभावित मतदार होय.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| जनता पक्ष | % मतदान | फरक |
|---|---|---|
| १९७७ | ४४ | १९७७ ते ८० "= - २६ % |
| १९८० | १८.५ | १९८० ते ८४ = - ११.३७ |
| १९८४ | ७.१३ | |

यावरून १९८०, १९८४ मध्ये अनुक्रमे - २५ %, - ११ % आढळणारा फरक म्हणजे परिवर्तनशील किंवा गटांनी प्रभावित मतदार होय.

| भा.क.प. | % मतदान | फरक |
|---|---|---|
| १९७७ | ५.१ | १९७७ ते ८० = -- १ |
| १९८० | ६.१ | १९८० ते ८४ = - ०.२ |
| १९८४ | ७.७३ | |

यावरून १९८०, १९८४ मधील अनुक्रमे +- १ %, - ०.२ % मतदानातील आढळणारा फरक म्हणजे परिवर्तनशील किंवा गटांनी प्रभावित मतदार होये.

| मा.क.प. | % मतदान | फरक |
|---|---|---|
| १९७७ | ४.९ | १९७७ ते ८० = - २.३ |
| १९८० | २.६ | १९८० ते ८४ = - ०.१ |
| १९८४ | २.७ | |

यावरून १९८०, १९८४ मधील निवडणुकीत - २.३ %, - ०.१ % मतदान हे परिवर्तनशील किंवा गटानी प्रभावित मतदार होता.

सारांश १९८४ च्या लोकसभा निवडणुकीतील राजकीय पक्षानी स्वीकारलेल्या जाहिरनाम्यांचा मतदान वर्तनावर कितपत प्रभाव पडला हे पाहण्यासाठी समाजातील विविध स्तरातील लोकांच्या मुलाखती घेतल्या. त्यावरून आणि या प्रकरणात केलेल्या अभ्यासावरून असे स्पष्ट होत की, राजकीय पक्षानी लोकांच्या विकासासाठी जाहिर केलेल्या राजकीय, सामाजीक व आर्थिक

विकासात्मक घोषणांचा भारतीय मतदारांवर कोणताही प्रभाव आढळून आलेला नाही. त्याशिवाय इतर पक्षांची परिवर्तनशील किंवा गटांनी प्रभावित मतदारांची टक्केवारीसुद्धा घटलेली दिसते. ग्रामातील मागासवर्गीय, झोपडपट्टीवासी व मध्यमवर्गीय या सर्व लोकांनी तत्कालीन इंदिरा गांधींच्या बलिदानाची पार्श्वभूमी आणि कॉंग्रेसने केलेले ऐक्याचे आवाहन त्यामुळे निर्माण झालेली सहानुभूतीची लाट या न घटकांचा फार मोठा प्रभाव पडला.

संदर्भ


१ एशियन सर्व्हे व्हाल्यूम XXI नं. २ फेब्रुवारी १९८१, पान १५0.

२ एशियन सर्व्हे व्हाल्यूम XXI नं. २ फेब्रुवारी १९८१, पान १५१.

३ इबिड पान नं. १५५.

४ गुप्ता आर. एल., इलेक्टोरल पॉलिटिक्स इन इंडिया, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाउस, दिल्ली, १९८५ पान 30 ते ३६

५ इबिड पान ३६ ते ३८

६ इबिड पान ३९ ते ४४

७ इबिड पान ५0 ते ५६

८ इबिड पान ४४ ते ५0

९ इबिड पान ५६ ते ६१

१0 इबिड पान ६१ ते ६५